**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

ऑफि.जन.१/ २०२३–२४/1009

१५ जून २०२३.

## सुधारीत परिपत्रक

**सर्व अनुदानित संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांच्या अवलोकनार्थ व पुढील आवश्यक कार्यवाही करीता सादर.**

**विषय : दि. १४.०६.२००६ पूर्वी विहित निवड समितीमार्फत नियुक्त व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या एम.फिल अर्हताधारक अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि ५ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये दि. १४ जून, २००६ पूर्वी एम.फिल अर्हतेवर विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त झालेल्या व ज्या अर्हताधारकांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे तसेच ज्यांनी सेवेत असताना दि. १ जानेवारी, १९९४ ते दि. ११ जुलै, २००९ या कालावधीत एम.फिल ही अर्हता धारण केलेली आहे, अशा अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करावयाचे आहेत.

तरी दि. १४ जून, २००६ पूर्वी विहित निवड समितीव्दारे नियुक्त एम.फिल अर्हताधारक अध्यापक ज्यांना विद्यापीठाने मियमित मान्यता दिलेली आहे तसेच ज्यांनी सेवेत असताना दि. १ जानेवारी, १९९४ ते दि. ११ जुलै, २००९ या कालवधीलन एम.फिल ही अर्हता धारण केली आहे व ज्यांना नेट अर्हतेतून अद्याप विद्यापीठ अनुदान आयोगाने सूट दिलेली नाही व यापूर्वी ज्या अध्यापकांचे प्रस्ताव UGC कडे सादर केलेले नाहीत, अशा अध्यापकांचे प्रस्ताव दि. २० जून, २०२३ पर्यंत विद्यापीठातील संलग्नता विभागाकडे सादर करावेत.

सदर प्रस्तावासोबत संबंधित अध्यापकांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावीत.

१. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून प्राप्त झालेली पद मान्यता
२. बिंदू नामावली
३. जाहिरात
४. निवड समिती अहवाल
५. नियुक्ती आदेश
६. रूजू अहवाल

D:\Pallavi\Affiliation (Pallavi)\CIRCULAR\Marathi Circular.docx

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

७. शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे (उदा. पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फिल गुणपत्रिका व पदवी इ.)
८. विद्यापीठ शिक्षक मान्यता प्रत

सर्व अनुदानित संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी वरील सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, प्रत्येक अध्यापकाचा स्वतंत्र प्रस्ताव याप्रमाणे विहित वेळेत सादर करावा.

याविषयी अधिकच्या माहितीकरीता संलग्नता विभाग, मुंबई यांच्याशी ईमेल affiliation@sndt.ac.in किंवा ०२२—२२०९१५७७ या फोनव्दारे कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

टिप: यापूर्वीचे हया विषयीचे परिपत्रक क्र. ॲफि.जन.१/२०२३—२४/६३४, दिनांक ०२ जून, २०२३ तात्काळ रद्द करण्यात आले आहे.

19/6/23.
(प्रो. मेधा तापिआवाला)
अधिष्ठाता, मानवताविज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

प्रत: १.प्र—कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
२.कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३.श्री. निलेश कासले, एज्युकेशन टेक्नॉलॉजी, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू (सदर परीपत्रक विद्यापीठाच्या वेबसाईटवर, संलग्नता विभागाअंतर्गत प्रसिध्द करावे.)
४.समन्वयक, मे.निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा.लि, नागपूर, (सदर परिपत्रक ॲफिलेशन ऑनलाईन पोर्टलवर प्रसिध्द करावे.)

सोबत — UGC चे पत्र क्र. १—१/२००६(पी.ए स)मिटिंग, दिनांक १७ नोव्हेंबर, २००६

D:\Pallavi\Affiliation (Pallavi)\CIRCULAR\Marathi Circular.docx